# कार्यालय जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर

E-Mail id gadzpaurangabad@gmail.com

दुरध्वनी क्र. ०२४०-२३२९७१४, Fax No. ०२४०-२३३५५७३

संकेत स्थळ -

https://chhatrapatisambhajinagarzp.maharashtra.gov.in


जा.क्र./जिपछसं/साप्रवि/प्रशासन-१/कावि/२०२५/12C38 दिनांक:- ११.०९.२०२५

## :: अनुकंपा तत्वावरील पदभरती समुपदेशन प्रक्रिया सुचना ::

## दि. १५/०९/२०२५ दुपारी ०२ वाजता

जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगरकडील सन २०२४ या कॅलेंडर वर्षातील अनुकंपा तत्वावरील नियुक्तीची कार्यवाही करण्याचे प्रस्तावीत आहे. प्रतिक्षा यादीतील उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हता आणि प्रवर्गानुसार जिल्हा परिषदेकडे रिक्त असलेल्या पदांवर अनुकंपा तत्वावर नियुक्ती करणे करीता उमेदवारांची मुळ प्रतिक्षायादीवरुन संभाव्य निवड यादी तयार करुन मुळ कागदपत्रांची तपासणी करण्यात आलेली आहे. सदरील यादीतील उमेदवारांना जिल्हा परिषदेचे अधिनस्त रिक्त जागांवर पदस्थापना देणे करीता **दिनांक १५/०९/२०२५ रोजी वेरुळ सभागृह, जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर** येथे समुपदेशन प्रक्रियेचे आयोजन करण्यात आलेले आहे. समुपदेशन प्रक्रियेसाठी खालीलप्रमाणे वेळापत्रक तयार करण्यात आलेले आहे. रकाना क्र. ०२ मध्ये नमूद क्रमांकाचे उमेदवारांनी आपापल्या क्रमानुसार मुळ कागदपत्रांसह समुपदेशन प्रक्रियेला उपस्थित रहावे.

| अ.क्रं. | प्रतिक्षायादीतील उमेदवारांचा जेष्ठता क्रमांक | एकुण उमेदवाराची संख्या | समुपदेशनाची वेळ |
|---|---|---|---|
| १ | **अनुकंपा उमेदवार ज्येष्ठता सूची गट-क (०१ ते ७० उमेदवार) गट-ड (०१ ते १२ उमेदवार)** | ८२ | दि. १५/०९/२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता |

**टिप :-**

१. सदर समुपदेशनास उमेदवार उपस्थित न राहिल्यास त्यानंतर केलेली कोणतीही विनंती मान्य केली जाणार नाही.

२. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि. १७.०७.२०२५ व ग्राम विकास विभाग शासन निर्णय दि. ३१.०७.२०२५ अन्वये सदर समुपदेशन प्रक्रिया ही प्रतिक्षा यादीतील उमेदवारांचा ज्येष्ठता क्रम, उमेदवारांची शैक्षणिक अर्हता व उमेदवारांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार जिल्हा परिषदेकडे असणारी संवर्गनिहाय / प्रवर्गनिहाय रिक्त पदे विचारात घेऊन त्या मर्यादेत केली जाणार आहे याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

३. दि. ०१.०१.२०२५ रोजीचे अंतिम प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात आली आहे. या यादीत नावाचा समावेश केला याचा अर्थ उमेदवाराची निवड करण्यात आलेली आहे असा होत

नाही, त्यामुळे उमेदवारास अनुकंपा तत्वावरील नियुक्तीबाबत या मुद्यावर दावा करता येणार नाही.

४. जिल्हा परिषदेकडे असणारी संवर्गनिहाय / प्रवर्गनिहाय पद उपलब्ध नसल्यास नियुक्ती प्राधिकरण इतर संवर्गात उपलब्ध पदावर नियुक्तीबाबत निर्णय घेईल. सदर निर्णय अंतिम राहील.

५. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि. १७.०७.२०२५ व ग्राम विकास विभाग शासन निर्णय दि. ३१.०७.२०२५ चे सुधारित धोरणानुसार प्रतिक्षा यादीतील गट बदलाची तरतुद एकदाच अनुज्ञेय असल्याने आपण सादर केलेल्या विकल्पानुसार गट निश्चित करण्यात आलेला आहे. त्यानुसार उमेदवारांचे शैक्षणिक पात्रता व जात प्रवर्गानुसार गट-क संवर्गातील पद उपलब्ध नसल्यास पदाच्या उपलब्धतेमुळे गट-क प्रतिक्षा यादीतील उमेदवारास गट-ड मधील पदावर नियुक्ती अनुज्ञेय होणार नाही.

६. नियुक्तीचे बाबतीत नियुक्ती प्राधिकरण मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा निर्णय अंतिम राहील.

(राघवेंद्र घोरपडे)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)
जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर

प्रत

१ मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर यांना माहितीस्तव सविनय सादर.

२ संकेतस्थळावर व नोटीसबोर्डावर प्रसिध्दीसाठी